**सहायक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांना सहायक (गट-क) या पदाचा पदोन्नतीसाठी मानीव दिनांक देण्याबाबत**

**आदेश:-**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१**
**आदेश क्र.प्राधि/मा.दि./सहायक/२०२६/** 2201695 **/प्र.८.**
**दिनांक:-** 25.03.2026

**संदर्भ:**

१. म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक या संवार्गातील कर्मचारी यांना वरिष्ठ लिपीक या संवर्गातील प्राधिकरणाचे पदोन्नती आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/ २००८/२७८३/प्र.७, दि.२४.०६.२००८.
२. प्राधिकरणाचे वरिष्ठ लिपीक संवर्गात मानीव दिनांक देण्याबाबत निर्गमित कार्यालयीन आदेश क्र.प्राधि/एसईएन/२००८/३८९०/प्र.७, दि.१६.०९.२००८.
३. म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक या संवार्गातील कर्मचारी यांना सहायक (गट-क) या संवर्गातील प्राधिकरणाचे पदोन्नती आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१६/१९८०/प्र.८, दि.२९.०४.२०१६.
४. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९.
५. म्हाडा प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/मानीव दिनांक आदेश रद्द/२०२३/२५६७/प्र.८, दि.२९.०८.२०२३. (वरिष्ठ लिपीक या संवर्गासाठी पदोन्नतीकरिता दिलेला मानीव दिनांक रद्द केल्याबाबतचे आदेश).
६. वरिष्ठ लिपीक संवर्गात पदोन्नतीचा दिनांक रद्द झाल्याने वरिष्ठ लिपीक संवर्गाची माहे डिसेंबर २००९ अखेरची ज्येष्ठतासूची सुधारित करण्याबाबत प्राधिकरणाचे निर्गमित आदेश क्र.प्राधि/ज्ये.सु./सुधारणा/२०२३/१७१/प्र.१२, दि.२३.०१.२०२४.
७. सहायक संवर्गातील कर्मचारी यांनी सादर केलेली दि.२७.१२.२०२४ रोजीचे मानीव दिनांक मिळण्याबाबतचे निवेदन.
८. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१.
९. अतांत्रिक संवर्गातील म्हाडा प्राधिकरणातील कर्मचारी यांना मानीव दिनांक देण्याबाबतची विभागीय पदोन्नती निवड समितीची दि.०४.०२.२०२६ रोजीची बैठकीचे मंजूर इतिवृत्तांत.

**पार्श्वभूमी:-**

म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक संवर्गातील कर्मचारी यांनी प्रशासन विभागास दि.२७.१२.२०२४ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने त्यांना सहायक या पदाचा दि.२९.०४.२०१६ हा मानीव दिनांक मिळण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती.

म्हाडा सरळसेवा भरती २००८ अंतर्गत म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवर वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातील एकूण ६१ पदे भरणा करण्यात आली. सदरहू वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातील नेमणूका प्राधिकरणाकडून दि.०७.०३.२००८ रोजीच्या आदेशान्वये करण्यात आल्या. म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातून वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गात प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२००८/२७८३/प्र.७ दि.२४.०६.२००८ अन्वये एकूण ५८ कनिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी वर्गास वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना व कनिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार प्राधिकरणाच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नत केलेल्या कनिष्ठ लिपीक- टंकलेखक (गट-क) या संवर्गातील

एकूण ५८ कर्मचाऱ्यांना वरिष्ट लिपीक संवर्गातील पदोन्नतीचा दिनांक सरळसेवेने नेमणूक केलेल्या ६१ वरिष्ट लिपीकांच्या आधी एक दिवस म्हणजेच दि.०६.०३.२००८ हा दिनांक त्यावेळी पदोन्नतीची ८० पदे रिक्त असल्याने तसेच त्याचवेळी पदोन्नतीची कार्यवाही चालू असल्याने ज्येष्ठतेसाठी पूर्वलक्षी प्रभावाने प्राधिकरणाचे वरिष्ट लिपीक संवर्गात मानीव दिनांक देण्याबाबतचे कार्यालयीन आदेश क्र.प्राधि/एसईएन-२००८/३८९०/प्र.७, दि.१६.०९.२००८ अन्वये वरिष्ट लिपीक या पदाचा पदोन्नतीसाठी मानीव दिनांक ०६.०३.२००८ हा देण्यात आलेला आहे.

वरिष्ट लिपीक संवर्गातील एकूण ५८ कर्मचारी यांना वरिष्ट लिपीक या पदाचा पदोन्नतीसाठी दिलेला दि.०६.०३.२००८ रोजीचा मानीव दिनांक म्हाडा प्राधिकरणाकडून कार्यालयीन आदेश क्र. प्राधि/मानीव दिनांक आदेश रद्द/२०२३/२५६७/प्र.८, दि.२९.०८.२०२३ अन्वये रदद करण्यात आलेला आहे. सदरहू वरिष्ट लिपीक या पदासाठी दिलेला मानीव दिनांकाचा आदेश रदद करताना नमूद करण्यात आलेले आहे की, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९३प्र.क्र.२/९३/१२, दि.११.०६.१९९३ परिच्छेद क्र.१ मध्ये पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत भाष्य करण्यात आलेले आहे ते असे, "शासनसेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संदर्भात चुकीने अधिक्रमित केले असल्याचे किंवा डावलेले गेले असल्याचे निश्चित झाले तर त्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत विचार करण्यात येतो."

त्यापुर्वी म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गातून सहायक (गट-क) या संवर्गातील पदोन्नतीची रिक्त पदे भरण्यासाठी दि.१५.०७.२०१५ रोजी विभागीय पदोन्नती निवड समितीची बैठक पार पडली. सदरहू बैठकीमध्ये वरिष्ट लिपीक (गट-क) संवर्गातून सहायक (गट-क) या संवर्गात (खुला प्रवर्गात ५ कर्मचारी, अनु. जमाती प्रवर्गात ५ कर्मचारी व भ.ज.(क) या प्रवर्गात १ कर्मचारी असे) एकूण ११ कर्मचारी सहायक (गट-क) या पदोन्नतीसाठी समितीने निवडसूचीवर घेण्यास मान्यता दिली. तसेच प्रतिक्षायादीवर खुल्या प्रवर्गासाठी एकूण २० कर्मचारी व अनु. जाती प्रवर्गासाठी ३ कर्मचारी यांची पदोन्नतीसाठी समितीने निवड केली.

म्हाडा प्राधिकरणाने वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांना सहायक (गट-क) या संवर्गात प्राधिकरणाचे पदोन्नती आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१६/१९८०/प्र.८, दि.२९.०४.२०१६ अन्वये एकूण २१ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरहू पदोन्नती आदेशामध्ये अनु.क्र.१४ वरील श्री ए.आर.कुलकर्णी यांना सहायक संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. श्री ए.आर.कुलकर्णी यांची निम्न संवर्गातील म्हणजेच वरिष्ट लिपीक संवर्गातील पदोन्नती ही प्राधिकरणाच्या दि.२४.०६.२००८ रोजीच्या आदेशान्वये झालेली आहे. परंतु प्राधिकरणाच्या दि.१६.०९.२००८ रोजीच्या आदेशान्वये त्यांना वरिष्ट लिपीक या संवर्गातील पदोन्नतीसाठीचा दि.०६.०३.२००८ हा मानीव दिनांक प्राधिकरणाच्या दि.१६.०९.२००८ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेला आहे.

तदनंतर वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांना सहायक (गट-क) या संवर्गात प्राधिकरणाचे पदोन्नती आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१७/१७८४/प्र.८, दि.२६.०४.२०१७ अन्वये एकूण २२ कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यांनतरही प्राधिकरणाने वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गातून सहायक (गट-क) या संवर्गात पदोन्नती आदेश क्र. प्राधि/पदोन्नती/२०१७/४२२२/प्र.८, दि.१०.१०.२०१७ अन्वये एकूण ११ कर्मचारी यांना सहायक (गट-क) या संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरहू पदोन्नती आदेशामध्ये अनु.क्र.७ वर श्री.संतोष रामचंद्र भोसले यांना सहायक या संवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदरहू कर्मचारी हे म्हाडा सरळसेवा भरती २००८ अंतर्गत सरळसेवेने वरिष्ट लिपीक या पदावर नेमणूक झालेले आहेत.

वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गातील पदोन्नतीचा मानीव दिनांक रद्द झाल्याने वरिष्ट लिपीक संवर्गाची डिसेंबर २००९ अखेरची ज्येष्ठतासूची प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/ज्ये.सू./सुधारणा/२०२३/१७१/प्र.१२, दि.२३.०१.२०२४ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू आदेशात नमूद करण्यात आलेले आहे की, प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/एसईएन/२००८/३८९०/प्र.७, दि.१६.०९.२००८ रोजीच्या आदेशान्वये मानीव दिनांक दिल्याचे आदेश रद्द झाल्याने वरिष्ट लिपीक संवर्गाची ज्येष्ठतासूची सुधारित करणे क्रमप्राप्त होते. वरिष्ट लिपीक संवर्गाची माहे मे २०१० मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या ज्येष्ठतासूचीमध्ये मानीव दिनांक देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नांवे अनु क्र. १९६ पासुन आहेत. यादीमध्ये पदोन्नत झालेल्या ५६ व सरळसेवेने नियुक्त झालेल्या ४१ कर्मचाऱ्यांची नावे अनु क्र.१९६ पासून ते अनु.क्र.२९२

पर्यंत सलग आहेत. अनु क्र. १ ते १९५ पर्यंत ज्येष्ठतासुचीमध्ये बदल अभिप्रेत नाही. संदर्भीय आदेशान्वये मानीव दिनांक आदेश रद्द झाल्याने व सरळसेवा भरतीमधील गुणवत्तेनुसार सुधारित झाल्याप्रमाणे अनु.क्र.१९६ पासुन ते अनु.क्र.२९२ पर्यंत नावे सुधारित करुन सदरहू आदेशासोबत प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. अनु.क्र.२९३ पासुन पुढे यादीमध्ये बदल नाही, असे आदेशामध्ये नमुद आहे. सदरहू प्रसिध्द करण्यात आलेली वरिष्ट लिपीक (गट-क) संवर्गाची माहे डिसेंबर २००९ मधील सुधारित ज्येष्टतासुची ही म्हाडा सरळसेवा भरती परिक्षेतील प्राप्त गुणांच्या क्रमानुसार तयार करण्यात आलेली आहे.

म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक संवर्गाची डिसेंबर २०२४ अखेरची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि/ज्येष्ठतासूची-२०२५/६९१६०६२/प्र.१२, दि.२०.०८.२०२५अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरहू प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यरत सहायक संवर्गातील कर्मचारी यांच्या नावाच्या शेऱ्यासमोर प्राधिकरणाचे आदेश क्र.२५६७/प्र.८, दि.२९.०८.२०२३ व आदेश क्र.१७१/प्र.१२, दि.२३.०१.२०२४ अन्वये वरिष्ठ लिपीक संवर्गात २००९ च्या ज्येष्ठतासूचीमध्ये केलेली सुधारणा विचारात घ्यावी, असे नमूद केलेले आहे. सदरहू यादीमधील अनु.क्र.४५ ते अनु.क्र.८४ मधील सहायक संवर्गातील कर्मचारी यांच्या नावांच्या शेऱ्यासमोर ज्येष्ठतासूचीमध्ये सुधारणा विचारात घेण्यात यावे, असे नमूद करण्यात आलेले आहे.

म्हाडा प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातून सहायक (गट-क) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची दि.१५.०७.२०१५ रोजी बैठक पार पडली होती. सदरहू बैठकीमध्ये निवड समितीने खुल्या प्रवर्गातून प्रतिक्षा यादीवर अनु.क्र.१४ ते अनु.क्र.२० (श्री ए आर कुलकर्णी, श्री ए एन हरेकर, श्रीमती पी पी मंत्री, श्रीमती एम एस पाटील, श्रीमती एस सी बापट, श्री एस जी पाटील व श्रीमती आर आर भोसले) या कर्मचारी यांना सहायक (गट-क) या संवर्गात पदोन्नती देण्यासाठी निवड समितीने मान्यता दिली. तदनंतर म्हाडा प्राधिकरणाकडून वरिष्ठ लिपीक संवर्गातून सहायक (गट-क) या संवर्गात पदोन्नती आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१६/१९८०/प्र.८, दि.२९.०४.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले.

सदरहू सहायक (गट-क) यांच्या दि.२९.०४.२०१६ रोजीच्या पदोन्नती आदेशात अनु.क्र.१४ वर श्री. ए.आर. कुलकर्णी, अनु.क्र.१५ वर श्री ए एन हरेकर, अनु.क्र.१६ वर श्रीमती पी पी मंत्री, अनु.क्र.१७ वर श्रीमती एम एस पाटील, अनु.क्र.१८ वर श्रीमती एस सी बापट, अनु.क्र.१९ वर श्री एस जी पाटील व अनु.क्र.२० वर श्रीमती आर आर भोसले या कर्मचारी यांचा समावेश आहे.

प्राधिकरणाच्या दि.०३.०५.२०१६ रोजीच्या नेमणूक आदेशान्वये श्री संदेश कोंडीबा शिंगोलीकर यांची सहायक (गट-क) या संवर्गात सरळसेवेने नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे वरिष्ठ लिपीक (गट-क) संवर्गातील कर्मचारी यांना सहायक संवर्गातील दि.२९.०४.२०१६ रोजीचा मानीव दिनांक दिलेल्या एकूण ज्येष्ठतासूचीतील क्रमाप्रमाणे त्यांच्या नावाचा समावेश श्री नितीन कुलथे यांच्या नावाच्या नंतर व श्री शरद विश्वासराव भिसे यांच्या नावाच्या अगोदर समाविष्ट करणे नियमोचित राहील. तदनंतर ज्येष्ठतासूचीतील उर्वरित कर्मचारी यांची नावे समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली-२०२१ प्रसिध्द केलेली असून सदरहू नियमावली ही दि.२१.०६.२०२१ रोजी अंमलात आलेली आहे

सदरहू नियमावलीतील **नियम क्र.(४)- ज्येष्ठतेचा मानीव दिनांक निर्धारित करणे:**

(१) नियम ३ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, पुढील पोटनियमात अंतर्भुत केलेल्या तरतूदीनुसार, सक्षम प्राधिकारी शासकीय कर्मचाऱ्यास एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यामधील त्याच्या प्रत्यक्ष नियुक्तीच्या दिनांकापेक्षा वेगळा असा दिनांक संबंधित पदावरील नियुक्तीचा मानीव दिनांक म्हणून नेमून देऊ शकेल आणि असा मानीव दिनांक निर्धारित करण्यात आल्यावर उक्त पद,संवर्ग आणि सेवा यातील त्याचा सेवाकाल त्यादिनांकापासून सुरु झाला असे समजून त्याच्या ज्येष्ठतेची गणना केली जाईल.परंतु असे की, दोन किंवा अधिक व्यक्तींना एकच मानीव दिनांक निर्धारित केल्यास, अशा प्रकरणी थेट भरतीने नियुक्त होणारे कर्मचाऱ्याचा ज्येष्टताक्रम हा आयोगाच्या किंवा निवडसमितीच्या शिफारस क्रमांनुसार निश्चित करावा आणि पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्याचा ज्येष्टताक्रम हा पदोन्नतीच्या पदाच्या निम्न संवर्गातील ज्येष्टतायादीतील त्याच्या क्रमानुसार निश्चित करावा, अशी तरतूद नमूद करण्यात आलेली आहे.

तसेच नियम क्र. ४ पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचाऱ्याचा ज्येष्ठतेचा मानीव दिनांक (ब) पदोन्नत व्यक्तीचा ज्येष्ठताक्रम, नियम ३ मधील पोटनियम (२) मधील खंड (ब) मधील उपखंड (II) मधील दुसऱ्या परंतुकात तरतुद केल्याप्रमाणे फेरमांडणी करुन निर्धारित केला तर त्याबाबतीत, त्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्यात येईल किंवा जर आढाव्यानुसार फेरमांडणी करण्याआधीच मानीव दिनांक दिलेला असेल तर, फेरमांडणी करुन निर्धारित केलेल्या त्यांच्या ज्येष्ठताक्रमाशी कालानुक्रमे अनुरुप होईल अशा तऱ्हेने सदर मानीव दिनांक सुधारित करण्यात येतील.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२१.०६.२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावलीमधील नियम क्र. ४ मधील तरतुदी व प्राधिकरणाच्या दि.२३.०१.२०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या वरिष्ठ लिपीक (गट-क) या संवर्गातील डिसेंबर २००९ अखेरच्या ज्येष्ठतासूचीनुसार वरिष्ट लिपीक संवर्गातील सुधारित यादीच्या अनुषंगाने सध्याच्या सहायक (गट-क) या संवर्गातील डिसेंबर २०२४ अखेरच्या प्रसिध्द झालेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासुचीमध्ये कर्मचारी यांची यादीमध्ये सुधारणा होऊन सध्याच्या सहायक (गट-क) या संवर्गातील (वरिष्ट लिपीक - सरळसेवेने भरती झालेले कर्मचारी) कर्मचारी वर्गास दि.२९.०४.२०१६ रोजीचा मानीव दिनांक देण्यास विभागीय पदोन्नती निवड समितीने दि.०४.०२.२०२६ रोजी मान्यता दिली.

सहायक (गट-क) या संवर्गाची डिसेंबर २०२४ अखेरची तात्पुरती ज्येष्ठतासुचीतील वरिष्ट लिपीक (गट-क) या संवर्गात दि.०६.०३.२००८ हा मानीव दिनांक रदद केल्यानंतर वरिष्ट लिपीक (गट-क) या पदोन्नतीचा दि.२४.०६.२००८ हा ग्राहय होत असल्याने वरिष्ट लिपीक या संवर्गात दि.०७.०३.२००८ रोजी सरळसेवेने नेमणूक केलेले कर्मचारी हे वरिष्ट होत असल्याने त्यांना सहायक (गट-क) संवर्गातील दि.२९.०४.२०१६ रोजीचा मानीव दिनांक देणे नियमोचित ठरते.

प्राधिकरणाकडून सहायक (गट-क) या संवर्गातील माहे डिसेंबर २०२४ अखेरच्या प्रसिध्द झालेल्या तात्पुरत्या ज्येष्ठतासुचीमध्ये अनु.क्र. १ ते २७५ या एकूण २७५ कर्मचारी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरील ज्येष्ठतासुचीमध्ये अनु.क्र.१ ते ४४ मध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल करणे अभिप्रेत नाही. अनु.क्र. ४५ ते ८४ यामधील एकूण ४० कर्मचारी यांच्या ज्येष्ठतासुचीमधील अनुक्रमांकामध्ये उक्त नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास व अनु.क्र.८५ ते अनु.क्र.२७५ मध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल न करता त्यानुसार सहायक या संवर्गातील सेवाज्येष्ठतायादी अंतिम करण्यास विभागीय पदोन्नती निवड समितीने मान्यता दिलेली आहे.

## आदेशः-

सबब उक्त नमुद सद्यस्थितीतील सहायक या संवर्गातील कर्मचारी यांची माहे डिसेंबर २०२४ अखेरची ज्येष्ठतासुची असून प्राधिकरणाच्या दि.२९.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये वरिष्ट लिपीक या पदाचा दि.०६.०३.२००८ हा मानीव दिनांक रदद केलेला आहे. त्यानुसार सदरहू माहे डिसेंबर २०२४ अखेरची ज्येष्ठतासुचीमध्ये सुधारणा करुन डिसेंबर २०२४ अखेरची ज्येष्ठतासुचीमधील कर्मचाऱ्यांचा अनुक्रमांकामध्ये बदल होऊन सदरहू सहायक या संवर्गातील कर्मचाऱ्यांचा समावेश ज्येष्ठतासूचीमध्ये (म्हाडा सरळसेवा भरती-२००८ मधील वरिष्ट लिपीक संवर्गातील प्राप्त परिक्षेतील गुणांच्या आधारे) समावेश करुन त्यांना सहायक या संवर्गातील दि.२९.०४.२०१६ रोजीचा मानीव दिनांक देऊन त्यांची डिसेंबर २०२४ अखेरची ज्येष्ठतासुची अंतिम करताना खालीलप्रमाणे सुधारणा करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | सहायक संवर्गाची डिसेंबर २०२४ च्या तात्परुत्या ज्येष्ठता सुचीतील अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | सहायक संवर्गातील पदोन्नतीचा मुळ नेमणूकीचा दिनांक | वरिष्ठ लिपीक या संवर्गातील मूळ नेमणूकीचा दिनांक | सहायक या पदाचा मानीव दिनांक | सहायक संवर्गाची डिसेंबर २०२४ ची अंतिम ज्येष्ठता सुचीतील सुधारीत अ.क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६७ | श्री संतोष रामचंद्र भोसले | १०.१०.२०१७ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.४५ वर स्थान निश्चीती |
| २ | ६८ | श्री सुधीर विजय गायकवाड | १०.१०.२०१७ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.४६ वर स्थान निश्चीती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६९ | श्री महेश श्रीकांतराव देशपांडे | १०.१०.२०१७ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.४७ वर स्थान निश्चीती |
| ४ | ७० | श्री अनिल विष्णू शिंदे | १०.१०.२०१७ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.४८ वर स्थान निश्चीती |
| ५ | ७२ | श्रीमती तन्वी संजय नवार | २०.०२.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.४९ वर स्थान निश्चीती |
| ६ | ७३ | श्री नितीन रंगनाथ कुलथे | २०.०२.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५० वर स्थान निश्चीती |
| ७ | ४८ | श्री संदेश कोंडीबा शिंगोलीकर | ०३.०५.२०१६ | -- | -- | अनु.क्र.५१ (सरळसेवा अन्वये थेट भरती ) |
| ८ | ७८ | श्री शरद विश्वासराव भिसे | ११.०४.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५२ वर स्थान निश्चीती |
| ९ | ७४ | श्री दयानंद आनंदराव अंगडीकर | २०.०२.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५३ वर स्थान निश्चीती |
| १० | ७५ | श्री प्रशांत रामचंद्र तपसाळे | २०.०२.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५४ वर स्थान निश्चीती |
| ११ | ७६ | श्री मनोजकुमार पांडुरंग शिराळे | ११.०४.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५५ वर स्थान निश्चीती |
| १२ | ७७ | श्रीमती वैशाली प्रभाकर कदम | ११.०४.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५६ वर स्थान निश्चीती |
| १३ | ७९ | श्रीमती सोनाली हरिश्चंद्र देशमुख | ०१.०८.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५७ वर स्थान निश्चीती |
| १४ | ८० | श्री नरेश विनायक गव्हाणे | ०१.०८.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५८ वर स्थान निश्चीती |
| १५ | ८१ | श्रीमती रसिका विजय म्हात्रे | ०१.०८.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.५९ वर स्थान निश्चीती |
| १६ | ८२ | श्रीमती किर्ती सावळाराम खंडारे | २३.१०.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.६० वर स्थान निश्चीती |
| १७ | ८३ | श्रीमती अर्चना संदीप तिखे | २३.१०.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.६१ वर स्थान निश्चीती |
| १८ | ८४ | श्रीमती कविता संतोष भोर | २३.१०.२०१८ | ०७.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.६२ वर स्थान निश्चीती |
| १९ | ४५ | श्रीमती पी. पी. मंत्री | २९.०४.२०१६ | २४.०६.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.६३ वर स्थान निश्चीती |
| २० | ४६ | श्रीमती मंगल स्वप्नील पाटील | २९.०४.२०१६ | २४.०६.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.६४ वर स्थान निश्चीती |
| २१ | ४७ | श्री आर एच चव्हाण | २९.०४.२०१६ | ०६.०३.२००८ | २९.०४.२०१६ | अनु.क्र.६५ वर स्थान निश्चीती |
| २२ | ४९ | श्रीमती प्रिया विश्वनाथ घाग | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.६६ वर स्थान निश्चीती |
| २३ | ५० | श्रीमती सुंगधा सुभाष इंदुलकर | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.६७ वर स्थान निश्चीती |
| २४ | ५१ | श्रीमती एस आर जाधव | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.६८ वर स्थान निश्चीती |
| २५ | ५२ | श्रीमती मोहिनी पी कोळेकर | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.६९ वर स्थान निश्चीती |
| २६ | ५३ | श्री शेख एम मोहम्मद | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.७० वर स्थान निश्चीती |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २७ | ५४ | श्रीमती स्नेहलता पी. लोखंडे | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.७१ वर स्थान निश्चीती |
| २८ | ५५ | श्रीमती विनिता विनायक केळुस्कर | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.७२ वर स्थान निश्चीती |
| २९ | ५६ | श्री गजेंद्र निंबादास कुलकर्णी | २६.०४.२०१७ | २४.०६.२००८ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.७३ वर स्थान निश्चीती |
| ३० | ५८ | श्री रविंद्र जे. जगताप | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.७४ वर स्थान निश्चीती |
| ३१ | ५९ | श्री अभिजीत एम. शिंदे | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.७५ वर स्थान निश्चीती |
| ३२ | ६० | श्री संतोश आर. डांगे | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.७६ वर स्थान निश्चीती |
| ३३ | ६१ | श्री अमृत जयबहादूर आग्री | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.७७ वर स्थान निश्चीती |
| ३४ | ६२ | श्री स्वप्नील आर. नाईक | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.७८ वर स्थान निश्चीती |
| ३५ | ६३ | श्री बापू बालन्ना म्यातरी | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.७९ वर स्थान निश्चीती |
| ३६ | ६४ | श्री डी डी कांबळे | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.८० वर स्थान निश्चीती |
| ३७ | ५७ | श्री नंदकिशोर पटल्या मावसकर | २६.०४.२०१७ | ३०.०४.२०१३ | २६.०४.२०१७ | अनु.क्र.८१ वर स्थान निश्चीती |
| ३८ | ६५ | श्री मंगल बि.पाटील | १४.०७.२०१७ | २४.०६.२००८ | १४.०७.२०१७ | अनु.क्र.८२ वर स्थान निश्चीती |
| ३९ | ६६ | श्री शैलेश दिनानाथ सदावर्ती | १०.१०.२०१७ | २४.०६.२००८ | १०.१०.२०१७ | अनु.क्र.८३ वर स्थान निश्चीती |
| ४० | ७१ | श्रीमती सुमता अशोक गाणगेर | १०.१०.२०१७ | ३०.०४.२०१३ | १०.१०.२०१७ | अनु.क्र.८४ वर स्थान निश्चीती |

**१/-** सबब वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली वस्तुस्थिती ही दि.०४.०२.२०२६ रोजी विभागीय पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आली. विभागीय पदोन्नती निवड समितीने उक्त नमूद सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, २०२१ तरतूदीनुसार सहायक (गट-क) या संवर्गातील उक्त नमुद अ.क्र.०१ ते अ.क्र. १८ (अ.क्र.७ वगळून) एकुण १७ सहायक संवर्गातील कर्मचारी यांना सहायक (गट-क) या पदाचा पदोन्नतीसाठी दि.२९.०४.२०१६ हा मानीव दिनांक देण्यात येत आहे.

**२/-** म्हाडा प्राधिकरणाच्या सध्य स्थितीमध्ये नियत आस्थापनेवरील सहायक (गट-क) या संवर्गातील माहे डिसेंबर २०२४ अखेरच्या अंतिम ज्येष्ठतासूचीमध्ये उक्त नमुद सुधारणा करुन अ.क्र.०१ ते अ.क्र. १८ (अ.क्र.७ वगळून) एकूण १७ सहायक संवर्गातील कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर शेरा रकानामध्ये सध्याच्या पदावरील नेमणूकीचा दिनांक हा दि.२९.०४.२०१६ असा दर्शविण्यास यावा.

**३/-** उक्त नमूद सहायक (गट-क) या संवर्गातील कर्मचारी यांनी सदरहू कालावधीमध्ये प्रत्यक्ष त्या पदावर काम केलेले नसल्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

**[ मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण**

**यांचे मान्यतेने ]**

Digitally signed by
Mayur Madhukar Ghodwinde
Date: 25-03-2026 18:25:49

**(मयूर घोडविंदे)**

**प्रशासकीय अधिकारी-२/प्राधिकरण**

**प्रति,**

**(.......................................................)**

**(संबंधित कर्मचारी यांना त्यांचे विभाग प्रमुखामार्फत)**

१. श्री संतोष रामचंद्र भोसले/सहायक (गट-क) (तत्कालीन)
२. श्री सुधीर विजय गायकवाड/सहायक (गट-क) (तत्कालीन)
३. श्री महेश श्रीकांतराव देशपांडे/सहायक (गट-क)
४. श्री अनिल विष्णू शिंदे/सहायक (गट-क) (तत्कालीन)
५. श्रीमती तन्वी संजय नवार/सहायक (गट-क) (तत्कालीन)
६. श्री नितीन रंगनाथ कुलथे/सहायक (गट-क)
७. श्री शरद विश्वासराव भिसे/सहायक (गट-क)
८. श्री दयानंद आनंदराव अंगडीकर/सहायक (गट-क)
९. श्री प्रशांत रामचंद्र तपसाळे/सहायक (गट-क)
१०. श्री मनोजकुमार पांडुरग शिराळे/सहायक (गट-क)
११.श्रीमती वैशाली प्रभाकर कदम/सहायक (गट-क)
१२. श्रीमती सोनाली हरिश्चंद्र देशमुख/सहायक (गट-क)
१३. श्री नरेश विनायक गव्हाणे/सहायक (गट-क)
१४. श्रीमती रसिका विजय म्हात्रे/सहायक (गट-क)
१५. श्रीमती किर्ती सावळाराम खंडारे/सहायक (गट-क)
१६. श्रीमती अर्चना संदीप तिखे/सहायक (गट-क)
१७. श्रीमती कविता संतोष भोर/सहायक (गट-क)

**प्रत सस्नेह अग्रेषित:-**

१. मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मुख्य अभियंता-१,२,३/प्रा.
३. मा.मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
४. वित्त नियंत्रक/प्रा.
५. विधी सल्लागार/प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८. मुख्य अधिकारी/कोंकण/मुं.झो.सु.मंडळ/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/नागपूर/अमरावती
९. सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१०. चौकशी अधिकारी/प्रा.
११. सक्षम प्राधिकारी-१,२/प्रा.
१२. मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१३. मुख्य माहिती संचार तंत्रज्ञान कक्ष/प्रा. (संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी).
१४. मुख्य लेखाधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१५. लेखाधिकारी/प्रा./कोंकण/मुं.झो.सु.मंडळ/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/नागपूर/अमरावती
१६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी/प्रा.
१७. संचालक, पीडीसी.

**प्रत:** प्रशासकीय अधिकारी-१,२/प्रा./मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ/ कोंकण/मुं.झो.सु.मंडळ/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर /नागपूर /अमरावती यांना माहितीसाठी.

**प्रत:** कार्यासन अधिकारी/वित्त नियंत्रक/प्रा, कार्यासन अधिकारी/क-शाखा/मु.ले.अ./मुंबई मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक.

प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.
प्रत, प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.
प्रत, अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई.
प्रत, अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई.
**प्रत:** प्रशासन-१२/प्रा. यांना उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
**प्रत:** प्रशासन-६, ७, ८, ९, १०, ११, १३, १४(अ), १४(ब), १५, १६, १७/प्रा.
**प्रत:** निवडनस्ती.